# <u>मराठी साहित्य परिषदेबद्दल चार शब्द</u> :-

आपल्या मॉरिशस देशातील मराठी साहित्य परिषद ही एक शिक्षण संस्था आहे, ही शिक्षण संस्था १७ जुलै १९६९ साली जन्मास आली म्हणजेच मराठी साहित्य परिषदेचा श्रीगणेश झाला. मराठी परिषदेचे पहिले संस्थापक "प्राध्यापक गजानन पुरुषोत्तम जोशी हे होते. सुरुवातीला परिषदेमध्ये फक्त मराठी भाषा बोली स्वरूपात बोलली जाऊ लागली व त्याच स्वरूपात शिकवली जाऊ लागली, पण नंतर हळूहळू माय मराठीचा विकास होत गेला. प्राध्यापक जोशी यांनी आपल्या सहकाऱ्यांसह मराठी साहित्य परिषद या शिक्षण संस्थेचा विकास होत गेला आणि पुढे आपल्या देशात तीन ठिकाणी मराठी शाळा आरंभिल्या गेल्या. **एक- रोजबेल हाई स्कूल, दोन- वाकवा धार्मिक सभा आणि तीन- कॅम्ब्रिज कॉलेज बो बासिन**. तेव्हापासूनच विद्यार्थ्यांना प्रमाण भाषा शिकवण्याच्या जबाबदारीचा मुहूर्त मेढ झाला. आपल्या मुलांना व्याकरण शुद्ध पद्धतीने मराठी लिहिता-वाचता यावी या एकमेव हेतूसाठी मॉरिशस मराठी साहित्य परिषदेने ज्ञानदानाचे अमूल्य कार्य आपल्या हाती घेतले.

माझ्या यशाचा प्रवास पण परिषदेतच सुरू झाला. माझ्या जीवनात मला नक्की कुठे पोहोचायला पाहिजे, काय करायला पाहिजे, कोणता मार्ग निवडला पाहिजे या सर्व प्रश्नांची उत्तरे मला आपल्या मराठी साहित्य परिषदेत शिकता-शिकताच मिळाली बरं का.

थोडक्यात म्हणजे माझ्या जीवनात मला स्थिरता व ध्येय दाखवण्यापासून ते मला व माझ्या भविष्याला घडविण्याचे महत्वपूर्ण कार्य **<u>"मराठी साहित्य परिषद वाक्वा या सोनकिरण केंद्रानेच केले."</u>** आणि म्हणूनच आपल्या मराठी साहित्य परिषदेला माझा मानाचा मुजरा ..........

## <u>विषय</u> :- <u>“भाषा, संस्कृती, शिक्षण ते प्रगतीचा प्रवास, खूपच खास”</u>

**माझ्या मराठीची बोलू कौतुके ! परि अमृतातेहि पैजासी जिंके !! संत ज्ञानोबांनी** केलेल्या अमृतवाणीला मान देवून पुढे वळू. आपली माय मराठी भाषा, अमूल्य संस्कृती, वाघिणीचे दूध शिक्षण आणि भविष्याच्या प्रगतीचा प्रवास म्हणजे मला लाभलेल्या मराठी साहित्य परिषदेचा आशीर्वादच होय.

मराठी परिषदेचे आणि माझे नाते तसे खूपच जूने आहे. तशी गोष्ट २००४ ची आहे बरं का, मराठी भाषेची अत्यंत आवड पण शाळेत शिकण्यासाठी रोजचा एक तास मला खूपच कमी पडायचा कारण मी होते सर्वसामान्य वर्गातील विद्यार्थिनी म्हणजे मला जरा जास्तच प्रयत्न करावे लागत असे आणि आपल्या देशात मराठीच्या शिकवण्या नाहीच्या बरोबरच होत्या. आता करायचं काय? पुढे मराठी कशी शिकावी? कोणाची मदत घ्यावी? या प्रश्नांनी डोकं सुन्न. एका शनिवारी बसमधून प्रवास करताना दोन मुलींच्या काही गोष्टी कानी पडत होत्या, मन म्हणाले ऐकू नको संगीता वाईट सवय आहे, पण डोकं म्हणालं काही हरकत नाही संगीता नीट ऐकून घे आपल्या माय मराठी भाषेबद्दल तर बोलत आहेत. मग काय ..... डोकं पडलं मनावर भारी, ऐकून घेतली गोष्ट सारी. त्यातली एक मुलगी म्हणाली मराठीच्या दोन निबंधांपैकी मी फक्त एकाच केला आहे परिषदेत बाई काय म्हणतील? लगेच दुसरी मुलगी म्हणाली हरकत नाही गं मी पण एकचं निबंध लिहिला आहे, कारण मला पण दुसरा विषय व्यवस्थित समजला नाही आपण बाईंना किंवा गुरुजींना सांगू ते आपल्याला मदत करतील आणि परत नक्कीच समजावून देतील, या सर्व संभाषणातून दोन महत्वाच्या गोष्टी मात्र नक्कीच समजल्या एक म्हणजे जगाच्या कोणत्याही कानाकोपऱ्यात जा आपल्या मराठी भाषेचे शिक्षक अगदी आदरणीय, पूजनीय व जबरदस्त असतातच आपल्या विद्यार्थ्यांना लाडीगोडीनेच माय मराठी शिकवतात, आणि दुसरी गोष्ट म्हणजे

आपल्या मॉरिशस देशातसुद्धा मराठी साहित्य परिषद नावाचा खजिना आहे खजिना. विचार न करता थोडं धाडस करून मुलींना पत्ता विचारला. मग काय.... विचारला पत्ता मुलींना आणि पाय वळवले त्या दिशेला. बस थांबली वाक्वा बस स्थानकावर मग त्या मुली म्हणाल्या आम्ही पण परिषदेतच चाललो आहोत, तू ये आमच्या बरोबर त्यांचे आभार मानून मी त्यांच्या बरोबर निघाले. त्या वेळेस म्हणजेच २००४ साली आपली मराठी साहित्य परिषद 'मॉरिस कयूरे माध्यमिक शाळा' या माध्यमिक शाळेत दर शनिवारी खूपच आनंदोत्साहात भरत होती.

आखेरीस शाळेत प्रवेश केला, मुलींनी कोणाला भेटायचे ते व्यवस्थित समजावून दिले. त्यांचे मी खूप खूप आभार मानले व पुढची पायरी चढले. सगळी विचारपूस केली, आणि परिषदेतील मुख्यगुरुजींनी आज शनिवारपासूनच मला परिषदेत दाखल केले. त्या काळच्या अप्पर सिक्स् म्हणजे आजची बारावी बरं का, थोडक्यात मला बारावीच्या वर्गात प्रवेश मिळाला. मुख्यगुरुजी मला बारावीच्या वर्गाकडे नेत होते, जाता-जाता त्यांनी मला परिषदेविषयी बरीच महत्त्वपूर्ण माहिती दिली. मनातील आनंद गगनात मावेना. आखेरीस बारावीचा वर्ग आलाच, मी दाराबाहेर थोडं संकुचीतच उभी राहिले. परिषदेच्या मुख्यगुरूजींनी वर्गातील दुसऱ्या गुरुजींना अगदी आदराने बोलावले "गुरुजी कृपया बाहेर येता का एक मिनिट?" असे म्हणून वर्गातील गुरुजींना बोलावले. तोच अस्सल महाराष्ट्रीयन रुबाबात एक गुरुजी बाहेर आले, चेहऱ्यावर समाधान आणि स्मित हास्य ते गुरुजी म्हणाले "काय गुरुजी काय म्हणताय?" परिषदेचे मुख्यगुरुजी म्हणाले "गुरुजी.... ही आहे संगीता हिने या वर्षी बारावीच्या परीक्षात मराठी हा विषय मुख्य घेण्याचा विचार केला आहे, तर गुरुजी आता हिच्या परीक्षेची जवाबदारी तुमची". बारावीच्या वर्गातून आलेले गुरुजी लगेच म्हणाले "होय गुरुजी ठीक आहे काही काळजी करू नका मी बघतो सगळं". परिषदेचे गुरुजी धन्यवाद म्हणून आपल्या परिषदेच्या कचेरीत म्हणजेच त्यांच्या एका वर्गात गेले. बारावीच्या गुरुजींनी मला आदरासह आपल्या वर्गात नेले. सर्व विद्यार्थ्यांना मला माझा परिचय करून देण्यास सांगितला. मी पण मोठ्या जोशात माझा परिचय

दिला सर्वांनी माझे मनःपूर्वक स्वागत केले. माझे मन तर गद्गद् झाले आनंदाने गहिवरले. मग त्या बारावीच्या गुरुजींनी मला आपला परिचय दिला. आणि हो मित्रहो हेच ते आपल्या सर्वांचे लाडके गुरुजी.... गुरुजी होमराजन गौरिया. वेळ न लागता संपूर्ण वर्गाच जणू काही माझे सखे सोबती झाले, "सगळेच आपले, सगळेच आपलेसे" वर्गात गुरुजी लाडीगोडीने शिकवत होते, आणि आम्ही पण अगदी मन लावून ऐकत होतो आणि आनंदाने शिकतही होतो. गुरुजींच्या वर्गात मजाल आहे आम्हा विद्यार्थ्यांना कंटाळा येईल, कारण वर्गातील वातावरण खूपच आनंदी असे अजूनपर्यंत ते वातावरण अगदी तसेच्या-तसेच आहे. गुरूजींची मराठी शिकवण्याची पद्धत अगदी सोपी त्यावर बोनस म्हणजे वेळोवेळी वेगवेगळी. मजेदार उदाहरणेसुद्धा मग काय... मराठी शिकण्याची आणि बारावीत चांगले गुण आणून दाखवण्याची जिद्द आम्हा मुलांना आमच्या गुरुजींनीच दिली बर का.... दर शनिवारी मी न विसरता परिषदेत जाऊ लागले, मग थंडी असो किंवा पाऊस आमचे वर्ग हसत खेळत भरत असे आजपर्यंत..... आम्ही सर्व खूप प्रयत्न करू लागलो, मग अभ्यासक्रमातील "संत ज्ञानेश्वरांच्या "श्रीमद् भगवत गीतेचे" धडे असो, किंवा बालकवी, कुसुमाग्रज यांसारख्या कवींच्या कविता असो, किंवा त्यावेळी मी अभ्यासलेल्या कादंबऱ्या असो वा कथा असो ते आजतागायत विसरणे शक्यच नाही, इतक्या सोप्या पद्धतीने गुरुजींनी शिकवले की ते आजपण तोंडपाठ आहे. परिषदेत शिकता-शिकता आता डोक्यात दुसऱ्या प्रश्नांनी जन्म घेतला बरं का.... जसं की संगीता फारचं छान! आता मराठी बारावीच्या नॅशनल परीक्षेत भाग घेशील, पाससुद्धा होशील.... पण पुढे काय? पुढे काय करणार? मराठी तुला नक्की कोठे घेवून जाणार? या प्रश्नांच्या गुरफटयात मी अडकले अनं तडक गुरुजी होमराजन यांना भेटले, त्यांना माझी व्यथा सांगितली. गुरूजी लगेचच म्हणाले "यात काळजीचं काहीच कारण नाही संगीता तू आपल्या मॉरिशस देशातील सरकारी शाळांमध्ये आपल्या मुलांना मराठी शिकवं. मराठीची शिक्षिका बन". इतक्या दिवसांपासून डोक्याला झालेला त्रास गुरुजींनी कसा एका वाक्यात मिटवला खरा आणि सहज

भविष्याला एक सुंदर मार्गसुद्धा दाखवला. मग.... मग काय मनानं निश्चय घेतला आणि त्यात डोकयानं पण साथ दिली बरं का.. आता फक्त आणि फक्त प्राथमिक किंवा माध्यमिक शाळेत आपल्या विद्यार्थ्यांना मन लावून मराठी शिकवायचचं. थोडक्यात मराठी साहित्य परिषदेने माझं  भविष्यपण मार्गी लावल असं म्हणायला हरकतचं नाही. परिषदेत शिकून मी  “प्रायवेट स्टुडेंट” म्हणून बारावीची परीक्षा दिली पाससुद्धा झाले आणि नवलं म्हणजे संपूर्ण देशात मी प्रथम क्रमांकावर आले, आणि आमच्या परिषदेच्या अनमोल नियमाप्रमाणे चांगले गुण मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार! म्हणजेच परिषदेच्या तर्फे सत्कारसन्मान समारंभ होत असतो आणि आज पण होतो बरं का, त्या समारंभात मला किती तरी पारितोषिके मिळाली अजूनपर्यंत सांभाळून ठेवली आहेत मी माझ्या परिषदेतील प्रवासाची पोहच पावती आहेत ती पारितोषिके, म्हणजेच आमच्या मराठी साहित्य परिषदेतर्फे वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ मोठ्या थाटामाटाने आयोजला केला जातो. मोठ-मोठे नेते या कार्यक्रमास आपली हजेरी लावतात. समारंभ खूपच मोठा असतो जणू काही या दिवशी कोणता तरी मोठा उत्सवच भरलेला दिसते. देशातील विभिन्न मराठी साहित्य परिषदेतून आणि मराठी मंदिरामधून अनेक स्पर्धा पण आयोजित केल्या जातात जसे की- निबंध, वकृत्व, कविता, गोष्टी, गाणी इत्यादि.... परिषदेच्या पारितोषिक वितरण समारंभाच्या दिवशी सर्व उत्तीर्ण व विजेत्या मुलांना सुंदर-सुंदर पारितोषिके देण्यात येतात. आपल्या देशातील सर्व मराठी साहित्य परिषदेतील आणि मराठी मंदिरात मनोभावाने शिकवणारे आमचे शिक्षक गुरुजी, बाई, आणि आनंदाने शिकणारे सर्व वर्गागटातील आणि वयोगटातील आमचे विद्यार्थी-विद्यार्थिनी एका मोठ्या हॉलमध्ये एकत्र येतात आणि पारितोषिक वितरण समारंभाचा आनंद घेतात ते पण सांस्कृतिक कार्यक्रमासह लहान-मोठी मुले मराठी कविता, मराठी गीतं, मराठी गोष्टी सांगून दर्शकांचे मनोरंजन करतातच तर काही मुलं कोळी गाण्यांच्या नृत्यावर आपल्याला पण नाचवतात, तर काही आपल्या

महाराष्ट्राची शान 'लावणी'वर आपल्याला थिरकायला मजबूर करतात जस कि - मी हाय कोळी.... सोरील्या होरी.., आणि

लटपट लटपट लटपट लटपट

तुझं चालणं गं मोठ्या नखऱ्याचं.... चालणं गं मोठ्या नखऱ्याचं,

बोलणं गं मंजुळ मैनेचं.... बोलणं गं मंजुळ मैनेचं,

नारी गं.... नारी गं.... नारी गं.... नारी गं.....,

माफ करा मित्र-मैत्रिणींनो लावणी आली की त्या लावणीचं एक पूर्ण कडवं गायल्याशिवाय मनाला चैनचं मिळत नाही. परिषदेचे माझ्या जीवनात खूप महत्वाचे स्थान आहे. अगदी वटवृक्षाप्रमाणे छाया देवून आमचे जीवन सफल केले मराठी साहित्य परिषदेने.

पुढे महात्मा गांधी संस्थान मोक मधून मी डिप्लोमा इन मराठी स्टडीज केलं आणि त्यातपण प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले, मग यूनिवर्सिटी ऑफ मॉरिशस मधून बी. ए टॉप अप मराठीत केलं आणि त्यातसुद्धा प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले, आता तर मी सरकारी शाळेत आणि आपल्या त्याच मराठी परिषदेत आपल्या चिमुकल्यांना मराठी भाषा शिकवते आणि बरोबर आपल्या संस्कृतीचे धडे सुद्धा देते कारण माय मराठी आणि मराठी संस्कृती यांचा आत्मा एकच बरं का.... माझं जीवन, आयुष्य सफलच झालं म्हणा. माझ्या या सफलतेचा पाया मात्र वाक्वा मराठी साहित्य परिषदच होता. माझ्या यशाचे मानकरी म्हणजे आपले दैवत "छत्रपती शिवाजी महाराज जी", तसेच माझ्या मराठीचे अनमोल गुरुवर्यांच्या हाती शिक्षण घेण्याचे सौभाग्य मला मिळाले. गुरुजी संजय गोविंद, गुरुजी गोविंद, गुरुजी बिदन आबा, गुरुजी होमराजन गौवरिया, बाई मधुमती कुंजल, बाई अमिता कुशना, बाई निशी लक्ष्सीमों हिरू आणि गुरुजी शिरीष रामा या सर्व गुरुवर्यांचे लाभलेले आशीर्वाद, धडे, मदत, माझ्या आई-वडिलांचे आशीर्वाद, साथ, माझे कठोर परिश्रम आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे वाक्वा मराठी साहित्य परिषदेचे माझ्यावर असणारे उपकार,

वेळोवेळी दिलेला पाठिंबा हेच होय. आणि आज जवळ-जवळ पंधरा वर्षे मी शिक्षण क्षेत्रात आपल्या मुलांना मराठी शिकवते कधी प्राथमिक शाळेत तर कधी माध्यमिक शाळेत, थोडक्यात माझ्या सतरा वर्षे मराठी शिकवण्याच्या अनुभवला वाक्वा मराठी साहित्य परिषदेचा खूपच मोठा वाटा आहे, वाक्वा मराठी साहित्य परिषदेचा मला अत्यंत अभिमान तर आहेच त्याच बरोबर मला माझ्या माय मराठी भाषेचा गर्वसुद्‌धा आहे. परेषदेच्या कृपेने लाभलेले आमचे लाडके होमराजन गुरूजी माझ्या परिषदेतील पहिल्या दिवसापासून ते आज तब्बल दोन दशकांपर्यंत फक्त मलाच नाही तर संपूर्ण मॉरिशस देशातील मराठीच्या नव-नवीन शिक्षकांना, मराठीच्या विद्‌यार्थ्यांना आज पण त्याच उत्साहात शिकवतात त्याच बरोबर सर्व प्रकारची मदत पण नक्कीच करतात. मग फोटोकॉपी असो, नोट्‌स असो, कोणत्याही लेखकाचे मराठीचे पुस्तक असो किंवा कितीही मोठी अडचण असो गुरुजी होमराजन मोठ्‌या मनाने आणि निस्वार्थपणे सर्वांची मदत न विसरता करतातच. मराठी साहित्य परिषदेतील बाकीचे सर्व गुरुजी आणि बाई पण सर्वांची मनापासून न विसरता मदत करतातच करतात.

जबरदस्त आनंदोत्सवाच्या वातावरणात अनेक रंगीबेरंगी सांस्कृतिक कार्यक्रमांची थाळी मराठी साहित्य परिषद दर वर्षी सजवतचं असते ज्यामुळे आम्हा विद्‌यार्थ्यांना आपल्या पूर्वजांच्या महान कार्याची आठवण न विसरता होते. दोनशे वर्षापूर्वी आपले पूर्वज महाराष्ट्रातून मॉरिशसमध्ये ऊसाच्या शेतात काम करण्यास आले होते, येताना आपल्या पूर्वजांनी आपल्या बरोबर फक्त आणि फक्त आपला देव, धर्म, संस्कृती व माय मराठी भाषा हाच ठेवा आणला होता, आणि आपल्या पूर्वजांचा ठेवा, मराठी संस्कृती, देव, धर्म, आणि भाषा जोपासण्याच्या महत्वपूर्ण कार्यात देशातील मराठी साहित्य परिषदेचा मोठा हातभार आहे. मराठी युवा वर्गाला मराठी भाषेची आठवण व्हावी, आपल्या पूर्वजांबद्‌दल आदर असाचं मनात असावा, आपल्या समाजाला आपल्या संस्कृतीच्या जवळीक नेवून आपली मूळं मजबूत

व्हावी या सर्व महत्वपूर्ण बाबींची दखल आणि काळजी मराठी साहित्य परिषद वारंवार घेतच असते.

आमच्या बॅचमध्ये शिकलेले माझे सर्व मित्रगण आज मोठ-मोठ्या पदांवर कार्यरत आहेत. काही माझ्यासारखे मराठीचे शिक्षक बनले तर काही दूरचित्रवाणी, आकाशवाणीवर मराठीचे कार्यक्रम सादर करतात, तर काही बँकेत, विमानात पण काम करत आहेत. म्हणजे मराठी साहित्य परिषदेने आम्हा मुलांना घडवलं आपल्या पायावर उभं करून समाजात मान, सन्मान, प्रतिष्ठा मिळवून दिली. सध्या आपल्या मराठी भाषेचे वर्ग 'सिवा बापू माध्यमिक शाळेत' आजपण त्याच उत्साहात मराठी परिषदेचे वर्ग भरले जातात बर का.. फक्त शाळा बदलली पण मुलांना मराठी शिकवण्याची गुरूंचा लळा आणि मराठी शिकण्याची मुलांची आतुरता आणि ओढ मात्र अगदी तशीच आहे, जशी आमच्या वेळेस होती. बस् एक बस स्थानकाचा फरक, फक्त पत्ता बदलला पण... पण मराठी साहित्य परिषदेत माय मराठी भाषेचा रुबाब व  सत्ता अजूनपण जबरदस्त सुपरहीट आहे आणि राहीलच.

थोडक्यात म्हणतात ना मनात जिद्द, बाप्पांचा आशीर्वाद आणि ज्या-ज्या वेळेस जे-जे व्हाचे आहे ते-ते होतेच आणि जे काही होतं ते मात्र चांगल्यासाठी, भल्यासाठीचं होतं. जसे की बसमध्ये भेटलेल्या त्या दोन मुली जणू काही सरस्वती मातेनेच माझ्यासाठी पाठवल्या होत्या त्यांच्यामुळे मला वाक्वा मराठी परिषदेचा मार्ग दिसला आणि तो मार्ग मी अभिमानाने निवडलासुद्धा आणि याची मला मुळीच खंत नाहीच बर का... कारण एक योग्य निर्णय आपल्या जीवनाची दिशा ठरवून माणसाचे भविष्य सुखरूप करून जीवनाची दशाचं बदलत आणि जीवन अगदी "बालकवींच्या आनंदी आनंद गडे इकडे तिकडे चोहीकडे" प्रमाणे एकदम परिपूर्ण बनतं............ अगदी माझ्या जीवन प्रवासाप्रमाणे.

मराठी साहित्य परिषदेला मानाचा नमस्कार आणि त्याची सेवा करणाऱ्या गुरुवर्यांना कोट-कोटी धन्यवाद.......